REGISTERED No. B. 3434

किर्लोस्कर
सेंट्रिफ्युगल
पंप



किर्लोस्कर बंधु लिमिटेड.. किर्लोस्करवाडी

# अर्थ

“ अर्थ एव प्रधानः ” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १६ | पुणें, बुधवार तारीख १० मे, १९५० | अंक १९

## भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

मुख्य कचेरीः—भोर, जि. पुणें.

शाखाः—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ६९,६०० |

### बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष.
न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. द. खोले.
श्री. चं. रा. राठी.
श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एल्एल्. बी.
श्री. बा. ग. धंडुके.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी

लवकरच पुणें कचेरीचें ऑफिस ३६१-६२, बुधवार पेठ, येथें जाणार आहे.

पुणें कचेरी ५१५ बुधवार } अधिक माहितीसाठी लिहा.
रा. गो. आगाशे, बी. ए. ( ऑ. )
मॅनेजर.

फोनः ३४५११ | तारः SAHYOG

## दि प्रॉव्हिन्शिअल इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्ह असोसिएशन, लि.

९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई १.


उत्पादकांच्या ( प्रोड्यूसर्स ) सोसायट्यांना असोसिएशन खालील मालाचा पुरवठा करतेः—

सूत, रसायनें, रंग, कच्चीं कातडीं व चामडीं,
कातडीं कमाविण्यास लागणारा माल,
कमावलेलें कातडें, इ., मशीन.
टूल्स आणि इक्विपमेंट इ.

आणि

खालील मालाच्या विक्रीस सहाय्य करतेः —

हातमागावरील कापड ( सुती व लोकरी ), धातूचें सामान, चंदनी लांकूड, रोजवुड आणि हस्तिदंती आर्टस अँड क्रॅफ्टस, रेशिम, जर, कातडीं व कातडी माल, खाद्य तेलं, लाकूड आणि कोळसा वगैरे.



## देशी धंद्यास उत्तेजन द्या.

१ तांदुळाची गिरणी २ डाळीची गिरणी ३ उसाचे चरक
४ चक्क्या ५ गोल करवत (लाकडें कापण्याकरितां) ६ टूल ग्राइंडर्स
व इतर ओतीव काम तयार करणार.

जी. जी. दांडेकर मशिन वर्क्स लिमिटेड

भिवंडी जि. ठाणें

व्हाया-कल्याण ( जी. आय. पी. रेल्वे )



# पांच हॉर्स पावरचें डिझेल एंजीन

घ्यावयाचें म्हणजे तें किर्लोस्कर पीटरच ! संपूर्ण पंपिंग सेटही मिळेल. चौकशी करा.

केळकर बंधू, बुधवार चौक, पुणें शहर.


## विविध माहिती

**भारत सरकारची कर्जफेड**—१९५०–५५ च्या मुदतीचें ४॥ टक्के व्याजाच्या दराचें उर्वरित कर्ज भारत सरकार ता. १५ मे १९५० रोजीं परत करणार आहे. त्या तारखेपासून ह्या कर्जावरील व्याज देण्यांत येणार नाहीं.

**साखरेचें उत्पादन वाढलें**—ता. ३१ मार्च रोजीं संपलेल्या पंधरवड्यांत भारतांतील साखरेच्या कारखान्यांनीं २१.५८ लाख मण साखरेचें उत्पादन केलें. १ नोव्हेंबर १९४९ पासूनचें उत्पादन लक्षांत घेतां एकूण उत्पादन २४७·४१ लाख मण झालें. ह्या मागील हंगामाचें उत्पादन २२८·२५ लाख मण झालें होतें.

**कानपूरच्या कामगारांसाठी घरें**—कानपूरमधील मजुरांसाठीं घरें बांधण्याची एक योजना युक्त प्रांताच्या सरकारनें आंखली आहे. ह्या योजनेला सुमारें ५०,००,००० रुपये खर्च येईल. त्यापैकीं दोन तृतीयांश रक्कम प्रांतिक सरकार खर्च करणार असून एक तृतीयांश मध्यवर्ती सरकार खर्च करणार आहे. योजनेसाठी जमीन मिळविण्यांत येत आहे. प्रत्येक घरांत दोन खोल्या, अंगण, स्नानगृह व स्वयंपाकगृह इतकी व्यवस्था करण्यांत येणार आहे. घराचें भाडें प्रत्येकीं ५ रुपये ठेवण्यांत येईल असें समजतें.

**पूर्व जर्मनी व जपान ह्यांचा व्यापार**—पूर्व जर्मनीकडून ६०,००० टन पोटॅशिअम घेण्याचा करार जपानमधील सोव्हिअट वकिलातीतर्फे, जपानच्या सरकारनें केला आहे. दर टनामागें ८५·५ डॉलर अशी किंमत ठरली आहे.

**काश्मीरमधील धान्यवसुली**—काश्मीर सरकारनें गेल्या वर्षी १७ लाख मण धान्याची वसुली केली. जम्मू संस्थानांत १,५०,००० मण भात आणि ८,००० मण गहूं इतकी वसुली करण्यांत आली. ह्या वर्षी संस्थानाला बाहेरचा तांदूळ आयात करावा लागणार नाहीं. गव्हाची आयातही २५,००० टनाऐवजीं १५ हजार टनच करावी लागेल असा अंदाज आहे.

**मद्रासच्या वीजपुरवठ्यांत कपात**—मेटूर आणि पापनाशम् धरणांतील पाणीपुरवठा कमी झाल्यामुळें त्या धरणांवर उत्पन्न होणारी वीज कमी पडूं लागली आहे. त्यामुळें मद्रासमध्यें घरांना व कारखान्यांना पुरविण्यांत येणाऱ्या विजेंत आणखी दहा टक्के कपात करण्यांत येणार आहे. नेहमीं वापरण्यांत येणाऱ्या विजेच्या पुरवठ्यांत आतापर्यंत ५० टक्के कपात करण्यांत आली आहे.

**चीनमधील पहिलें सरकारी शेत**—पेकिंगच्या ईशान्येस चीनच्या कम्युनिस्ट सरकारनें आपल्या मालकीच्या पहिल्या मोठ्या शेतीला सुरवात केली आहे.

**जाम मीलमधील रात्रपाळी बंद**—सोलापूर येथील जाम मिलच्या व्यवस्थापकांनीं ता. २६ मेपासून रात्रपाळी बंद करण्याचें ठरविलें आहे. त्याशिवाय दिवसपाळींतील कांहीं कामगारांना कमी करण्याचेंही जाहीर झालें आहे. ह्या आपत्तीमुळें सुमारें १,१०० कामगार बेकार होतील असा अंदाज आहे.

**हिंदी विद्यार्थ्यांना देणगी**—लंडनमधील इंडियन स्टुडंटस् ब्यूरो ह्या संस्थेला कपूरथळाच्या महाराजांनीं १,००० पौंडाची देणगी दिली आहे. ह्या रकमेच्या देणगीचा चेक त्यांनीं भारताचे लंडनमधील हाय कमिशनर श्री. कृष्ण मेनन ह्यांच्या स्वाधीन केला आहे.

**ग्रामीण भागांतील ड्रेनेजसाठी कर्ज**—संयुक्त प्रांतांतील ग्रामीण भागांतील सांडपाण्याची व्यवस्था करण्याची एक योजना आंखण्यांत आली आहे. ह्या योजनेसाठी भारत सरकारनें संयुक्त प्रांत सरकारला १० लाख रुपये कर्ज व मदत मिळून देऊं केले आहेत.

**विमा प्रतिनिधींचें संमेलन**—ता. २३ एप्रिल रोजीं सह्याद्रि विमा कंपनीच्या नाशिक शहर व जिल्ह्यांतील प्रतिनिधींचें पहिलें वार्षिक सम्मेलन कंपनीच्या स्वतःच्या मालकीच्या इमारतींत यशस्वीरीत्या पार पडलें. सम्मेलनाचें अध्यक्षस्थान कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. जी. जी. सौंदणकर, बी. ए. यांनीं मंडित केलें होतें. अध्यक्षीय भाषणांत त्यांनीं नव्या विमा कायद्याविषयीं प्रतिनिधींना माहिती सांगितली. सदरहू प्रसंगीं श्री. खोचे गुरुजी, श्री. जुन्नरे, श्री. देसाई, श्री. भंडारी व श्री. कुलकर्णी आदि प्रतिनिधींनीं समयोचित भाषणें व अनुभव कथन केले.

**अमेरिकेला मँगॅनीजची निर्यात**—अमेरिकेला मँगनीज धातू पुरविण्यांत भारतानें रशियाची जागा पटकाविली आहे. रशियानें १९४९ सालीं अवघें ७३,००० टन मँगॅनीज अमेरिकेला पुरविलें होतें. १९४८ सालीं मात्र ३,८५,००० टन मँगॅनीज रशियानें अमेरिकेला पुरविलें होतें; भारताच्या खालोखाल १९४९ सालीं द. आफ्रिकेनें ह्या धातूचा पुरवठा अमेरिकेला केला आहे.

**निलगिरी पर्वतावर नवी लागवड**—मद्रास प्रांतांतील निलगिरी पर्वतावर 'वॅटल' नांवाच्या झाडाची लागवड करण्यांत येणार आहे. ह्या झाडाच्या साली द. आफ्रिकेंतून भारतांत आयात कराव्या लागत असत. ह्या लागवडीला सरकारनें मान्यता दिली असून एकूण २१,००० एकर जमिनीवर ह्या झाडांची लागवड करण्यांत येणार आहे. सध्या 'वॅटल' च्या सालांच्या किंमती १०० रु. टनावरून ५०० रु. टनापर्यंत चढल्या आहेत. ह्या झाडांचा उपयोग कागद तयार करण्यासाठीं होतो.

**जर्मनी–भारत व्यापार**—ता. ३० जून रोजीं भारत आणि प. जर्मनी ह्यांच्या दरम्यान झालेल्या व्यापारी कराराची मुदत संपत आहे. आतां नव्या कराराची बोलणीं चालू करण्यांत आलीं आहेत. ह्या नव्या करारान्वयें उभय राष्ट्रांत साडेतीन ते चार कोटी डॉलर्सच्या मालाची देवाण–घेवाण होईल असा अंदाज करण्यांत आला आहे.


—सर्व प्रांतांतील—
सुती–गरम–रेशमी
—खादीचें माहेरघर—

# खादी मन्दिर

२६२, बुधवार पेठ
ढमढेरे बोळाजवळ,
पुणें २.

# अर्थ

बुधवार, ता. १० मे, १९५०





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## रशिआचें मांच्युरिआविषयक धोरण काय दर्शवितें ?

चीनमधील चँग-कै-शेकच्या राष्ट्रीय सरकारचा पराभव करून ी कम्युनिस्टांनीं सत्ता काबीज केली. राष्ट्रीय सरकारला ज्या र्थिक व सामाजिक प्रश्नांनीं भंडावून सोडलें होतें तेच प्रश्न ा नव्या कम्युनिस्ट सरकारला सोडवावयाचे आहेत. नवी र्थिक व्यवस्था बसवितांना चीनला सोव्हिएट रशिआवर अव-न रहावें लागणार आहे. परंतु परकीय राष्ट्राचें साह्य घेतांना लें राजकीय स्वातंत्र्य न गमावण्याची दक्षताही चीनच्या ाधाऱ्यांना घ्यावयाची आहे·

चीन आणि रशिआ ह्यांच्यांतील भावी संबंध कशा प्रकारचे तील ह्याचा अंदाज मांच्युरिआसंबंधीं रशिअन सरकारनें कारलेल्या धोरणावरून बांधतां येण्यासारखा आहे. चीनमधील सिद्ध प्राचीन तटबंदीच्या दक्षिणेकडील भागांत सोव्हिएट आचे संबंध गुंतलेले नाहींत. मांच्युरिआची गोष्ट मात्र तशी ीं. मांच्युरिआंत रशिआचे हितसंबंध अधिक असल्यामुळें हा ग चीनच्या मध्यवर्ती सरकारपासून कांहींसा स्वतंत्र राखणें णत्याही रशिअन सरकारच्या हिताचें आहे. झारचें सरकार ! होऊन नवें रशिअन कम्युनिस्ट सरकार आल्यावर सुद्धा ह्या बतींत फारसा फरक पडलेला नाहीं. मांच्युरिआंतील पोर्ट आर्थर ाणि डायरेन ह्या बंदरांत रशिआनें माल्टा करारान्वयें विशेष वलती मिळविल्या; त्यावेळीं चीनचें राष्ट्रीय सरकार सत्ताधारी होतें. ीनचें कम्युनिस्ट सरकार स्थापन झाल्यावर सो. रशियानें एक ा तह केला आहे. तहाच्यां कलमाप्रमाणें १९५२ च्या अखेर च्युरिआंतील रेल्वे आणि पोर्ट आर्थर ह्यांचा ताबा चिनी कम्यु-स्ट सरकारला मिळावयाचा आहे. मांच्युरिआचें महत्त्व शेआला लष्करी दृष्टीनेंही वाटतें. चीनमध्यें आतां कम्युनिस्ट रकार असल्यानें आपले लष्करी हितसंबंध पूर्वीपेक्षा अधिक रक्षित रहातील अशी खात्री रशिआला वाटत असावी; म्हणूनच र्ट आर्थर आणि मांच्यूरिअन रेल्वे ह्यांवरील ताबा सोडण्याचें बूल करण्यांत आलें असावें. रशिआंत बर्फापासून खुलीं अस-ारीं बंदरें फारच थोडीं आहेत. अर्थात् पॅसिफिक महासागरावरील शीं बंदरें हातचीं घालविण्यास रशिआ नाखूष असतो. ह्या ष्टीनें विचार करतां चीन व रशिआ ह्यांच्यांत झालेल्या नव्या हांत, संभाव्य युद्धासंबंधीं कांहीं गुप्त कलमें असणें असंभवनीय ाहीं. युद्ध झालेंच तर मांच्युरिआंतील बंदरांचा उपयोग रशिआ ीनच्या संमतीनें अगर संमति नसतांनाही करून घेईल ह्यांत ांका बाळगण्याचें कारण नाहीं. आधुनिक उद्योगधंद्यांत ागासलेल्या राष्ट्रांना, राजकीय दृष्ट्या एकाच रंगाच्या असलेल्या ाष्ट्रांना सुद्धा कोणत्या तरी बलिष्ठ राष्ट्रावर कसें अवलंबून रहावें ागतें ह्याचें एक ठळक उदाहरण आहे.

मांच्युरियाआचें महत्त्व रशिआला केवळ लष्करी दृष्टीनेंच ाहे असें नव्हे. पूर्व सैबेरिआंत रशियानें लष्काराला उपयोगी अशा कारच्या उद्योगधंद्यांची उभारणी केली आहे. अर्थात् ह्या नव्यानें वाढणाऱ्या उद्योगप्रधान भागाच्या पोटापाण्याची सोय करणें प्राप्तच आहे. हा भाग बहुतेक डोंगराळ आहे आणि शेतीला अनुकूल असें हवामानही तेथें असत नाहीं. रशिआच्या पश्चिमे-कडील प्रदेशांतून सर्व प्रकारची अन्नसामुग्री आणणें अवघड आहे. अशा परिस्थितींत मांच्युरिआंतील वरकड अन्नधान्य पूर्व सैबेरिआला पुरवितां आल्यास रशिआला तें हवें आहे. वास्तविक पहातां चीनला आपल्या नापीक भागांतील लोकांना मांच्युरि-आंतून खाद्य वस्तूंचा पुरवठा करतां येईल. मांच्युरिआची राजकीय आणि भौगोलिक परिस्थिति ही अशी असल्यानें कम्युनिस्ट चीन आणि रशिआ ह्यांच्यांत वितुष्ट येण्याचा संभव अगदींच नाहीं असें नाहीं.

आर्थिक व तांत्रिक दृष्ट्या परावलंबी असणाऱ्या लहानमोठ्या सर्व राष्ट्रांना उद्योगप्रधान बड्या राष्ट्रांच्या ओंजळीनें पाणी प्यावयास लागणें अशा रीतीनें अपरिहार्य दिसतें. अशा स्थितींत युद्धाचा भडका उडाल्यास मागासलेल्या राष्ट्रांना आजच्या जगांत पडलेल्या दोन राष्ट्रगटांपैकीं एकांत स्वेच्छेनें अगर अनि-च्छेनें सामील व्हावें लागल्यास नवल नाहीं. गेल्या महायुद्धांत आग्नेय आशियांतील लष्करी प्रमुखांना शास्त्रीय सल्ला देणारे प्रो. बर्नाल ह्यांनीं सीलोन संबंधीं काढलेले उद्गार वरील विवेचनास पुष्टि देणारेच आहेत. प्रो. बर्नाल ह्यांनीं असें मत व्यक्त केलें आहे कीं भावी युद्धांत सीलोनचा कबजा एखाद्या परराष्ट्राकडून घेतला जाईल !

---

### भारतांतलि राज्यांचीं १९५०-५१ चीं अंदाजपत्रकें

( आकडे कोटी रुपयांचे आहेत )

| | उत्पन्न | खर्च | वाढावा+ तूट− |
|---|---|---|---|
| मुंबई | ६१·३९ | ६१·३७ | +०·२ |
| मद्रास | ५५·२१ | ५५·५७ | −०·३६ |
| उत्तर प्रदेश ( सं. प्रां. ) | ५२·२६ | ५२·२१ | +०·०५ |
| प. बंगाल | ३३·९० | ३५.२३ | −१·३३ |
| ओरिसा | ३०·४४ | ३०·२० | +०·२४ |
| बिहार | २५·९० | २६·२७ | −०·३७ |
| पंजाब | १६·१८ | १६·१४ | +०·०४ |
| मध्य प्रदेश ( म. प्रां. ) | १७·५८ | १६·१७ | +१·४१ |
| आसाम | ९·०१ | ९·८८ | −०·८७ |
| त्रावणकोर–कोचीन | १४·०० | १४·३६ | −०·३६ |
| म्हैसूर | ११·७० | १२·५५ | −०·८५ |
| सौराष्ट्र | ७·५९ | ७·५६ | +०·०३ |
| राजस्तान | १६·०९ | १५·५९ | +०·५० |
| हैद्राबाद | २९·८९ | ३०·०१ | −०·१२ |
| 'पेपसु' | ५·०१ | ४·९९ | +०·०२ |

---

**१८ लाख झाडांची लागवड**—१५ ऑगष्ट १९४९ हा दिवस भारताचा तिसरा स्वातंत्र्यदिन आहे. त्या दिवशीं मुंबई राज्यांत १८ लाख नवीन झाडांची लागवड करण्यांत आली.

## ग्रामीण जीवन सुखी करण्यासाठी सहकाराचा अवलंब

ता. १७।४।५० रोजीं कणकवली येथें भरलेल्या रत्नागिरी जिल्हा सहकारी परिषदेंत अध्यक्ष श्री. दामोदर वामन पोतदार आपल्या भाषणांत म्हणाले:–

आपल्या जिल्ह्यांतील खनिज संपत्तीचा उपयोग करून घेण्यासारखी परिस्थिति कांहीं ठिकाणीं असूनही त्या दृष्टीनें आपलें पाऊल म्हणावें तसें पुढें पडलेलें नाहीं. याला अर्थातच तशींच कारणेंही आहेत. मुख्यत: वहातुकीच्या साधनांचा अभाव, भांडवलाचा अभाव, स्थानिक खनिज संपत्तीबद्दल अनिश्चित माहिती व तिचा उपयोग कोण्या व कश्यामार्गें करून घेणें शक्य आहे याबद्दलचें अज्ञान, इत्यादि. परंतु आणखी एक कारणही येथें नमूद करणें अवश्य आहे. तें म्हणजे जरूर ती अंगमेहनत चिकाटीनें न करण्याची प्रवृत्ति. नारळाचें क्षेत्र आपल्या जिल्ह्यांत आज आहे त्याहूनही मोठें करतां येणें अवघड नाहीं व त्यापासून निरनिराळे उद्योग–व्यवसाय आपणांस उपलब्ध करून घेतां येतील. त्रावणकार संस्थानची या दिशेनें जी प्रगति युद्धपूर्व काळांतही झाली होती, ती उद्बोधक ठरणारी आहे. काजू व तिळाचें तेल, आंबा, फणस, अननस, चिक्कू वगैरे फळांची लागवड करून त्यांचेवर योग्य तो तांत्रिक प्रयोग करून तीं फळें टिकाऊ स्वरूपांत डबे भरून इतर ठिकाणीं पाठविण्याचाही उद्योग चालू करितां येईल. पंजाबमधील मॉंटगॉमरी जिल्ह्यांत या दृष्टीनें झालेली प्रगति अनुकरणीय आहे. अर्थात साधनांची सुलभता व इतर अनेक बाबींवर ही प्रगति अवलंबून राहते हें दृष्टीआड करितां येत नाहीं.

युद्धोत्तर काळीं उद्योगधंदे सहकारी पद्धतीनें चालू करून सरकारी मदत व सहाय्य घेऊन त्यांचें स्वरूप मोठें केल्याचीं उदाहरणें आपल्या प्रांतांत गुजराथ भाग पाहिल्यास दिसून येतील. स्थानिक कार्यकर्त्यांनीं त्यांत बरीच चिकाटी दाखवून निष्ठेनें प्रयत्न केल्यास यश लाभतें, इतपत हा अनुभव जमेस धरण्याइतका फलद्रूप झाला आहे.

आपले जिल्ह्याचें जीवन सुखमय करण्यासाठीं आपण मेहनत करून योजना आंखल्यावाचून हें काम होण्यासारखें नाहीं. आपले सुदैवानें हिंदुस्थान सरकार व मुंबई सरकार कोयना योजनेसारख्याच योजनांचा विचार करीत आहे. आपणा सर्वांचे सुदैवानें ही योजना पूर्ण होईल अशी खटपट करणें अत्यंत जरूर आहे, परंतु जरी योजना पूर्ण झाली तरी त्या योजनांमुळें होणारे फायदे पदरांत पाडून घेण्यासाठी आवश्यक ती पूर्वतयारी करून ठेवली तरच त्याचा फायदा होईल व त्या दृष्टीनें ग्रामीण उद्योगधंद्यांची व उत्पादक स्वरूपाच्या सहकारी चळवळीची कांस आपणांस धरावी लागणार आहे. विणकर सोसायट्या, मच्छीमारी सोसायट्या, फळें टिकवणाऱ्या व त्यावर योग्य ते यांत्रिक–तांत्रिक प्रयोग करणाऱ्या सोसायट्या, शेती सुधारणा सोसायट्या, काजू, तीळ, खोबरें वगैरेंचें तेल गाळणाऱ्या सोसायट्या, यांची स्थापना करूनच आपणांस आपलें ईप्सित साधतां येईल व म्हणून त्यासाठीं पूर्व तयारी करणें हें हितावह आहे. सहकारी वाहतूक सोसायट्या, सहकारी शिक्षण संस्था, सहकारी हाऊसिंग, सहकारी इन्शुअरन्स, सहकारी आरोग्य संस्था, वगैरे अनेक तऱ्हेच्या सहकारी पद्धतीचा अवलंब करून चालविण्याजोग्या संस्था आपणांही येथें काढून आपली प्रगति करून घेतली पाहिजे. इतर जिल्हे, प्रांत, देश यांचे अनुभव पडताळून पाहिले पाहिजेत. उन्नतीचा सोपा व सरळ मार्ग म्हणजे "सहकार" हाच आहे.

## ब्रिटनची १९५० ची आर्थिक पाहाणी

( मा. म. काळे. )

गेल्या तीन वर्षांत शक्य झालेली आर्थिक प्रगति व १९४९ च्या सप्टेंबरपासून पौंडाच्या अवमूल्यनामुळें निर्माण झालेली परिस्थिति न त्यामुळें स्टर्लिंग गटांतील देशांकडून करण्यांत येणाऱ्या डॉलर खर्चांतील काटकसर या सर्व गोष्टींची छटा ब्रिटनच्या १९५० च्या आर्थिक पाहाणीवर स्पष्टपणें दिसून येते. गेल्या तीन वर्षांत उत्पादन–वाढीकडे विशेष लक्ष पुरविलें गेल्यामुळें ब्रिटनच्या औद्योगिक जीवनाची उत्पादन–वाढ ही एक मुख्य बाब बनली आहे व त्यामुळें १९५० च्या आर्थिक पाहाणींत सहजरीत्या उत्पादनवाढ होऊं शकेल हें गृहीत धरण्यांत आलें आहे. राष्ट्रीय गरजेशीं तेथील भांडवलदार व मजूर किती समरस झाले असले पाहिजेत याचें हें एक गमक आहे. मोटारी, पोलाद व कागद या धंद्यांच्या उत्पादनांत गेल्या वर्षी विशेष वाढ झाली व ती चालू वर्षींहि तशीच चालू राहील अशी अपेक्षा आहे. हें जरी सर्व असलें तरी अंतिम दृष्ट्या परराष्ट्रीय व्यापारांतील देण्याच्या परिस्थितीवर ब्रिटनची आर्थिक परिस्थिति अवलंबून राहाणार आहे, व यामुळें उत्पादनालाच सर्वांत जास्त महत्त्व आहे. उत्पादनाची व परराष्ट्रीय व्यापाराची परिस्थिति समाधानकारक राहाण्यासाठीं ब्रिटिश मालाची किंमत योग्य मर्यादेंत राहून ब्रिटनच्या मालाला इतर देशांकडून भरपूर मागणी कायम राहिली पाहिजे, मजुरांच्या पगारांत वाढ होतां कामा नये, सरकारच्या खर्चांत वाढ होतां कामा नये, व लोकांनीं बचत करून उद्योगधंद्यांत योग्य प्रमाणांत भांडवल गुंतविलें पाहिजे. भावी काळामध्येंहि ब्रिटनच्या अर्थव्यवहाराचें यश विशेषत: परराष्ट्रीय व्यापारांत निघणाऱ्या देण्याच्या परिस्थितीवर अवलंबून राहाणार आहे. १९४८ सालीं ब्रिटनची डॉलर तूट २८ कोटी पौंड होती, व १९४९ सालीं ती २७·५ कोटी पौंड झाली. अवमूल्यनामुळें निर्माण झालेल्या परिस्थितीचा जास्तांत जास्त फायदा ब्रिटनला मिळावयाचा असेल तर उत्पादन-वाढ कायम टिकली पाहिजे. अमेरिकेनें ब्रिटनच्या मालाचा उठाव जास्त प्रमाणांत केला पाहिजे, व चलनविस्तार होऊन अवमूल्यनाचे सुपरिणामांवर अनिष्ट परिणाम होतां कामा नये. ब्रिटनची एकंदर आर्थिक परिस्थिति सुधरण्यासाठीं अमेरिकन तेलाच्या खरेदीवरचा खर्च ब्रिटननें गेल्या वर्षापासून कमी केला आहे; आणि अमेरिकेच्या जहाजांवरहि ब्रिटन शक्य तितक्या कमी प्रमाणांत अवलंबून आहे. दक्षिण आफ्रिकेनेंहि कष्टसाध्य चलनाच्या देशांकडून होणाऱ्या आयातीवर खर्च करण्यासाठीं स्वत:चें कांहीं सोनें राखून ठेवण्याचें ठरविलें आहे, याचाहि अनुकूल परिणाम ब्रिटनच्या परिस्थितीवर होणें शक्य आहे. १९५० सालीं ब्रिटनचें संपत्तीचें एकंदर वार्षिक उत्पादन १३३४ कोटी पौंड होईल. गेल्या वर्षी उत्पादन १२८३ कोटी पौंड झालें होतें. १९५० च्या उत्पादनापैकीं ८६४ कोटी पौंड वैयक्तिक खर्च करणारांकडून म्हणजे खाजगी व्यक्तिंकडून खर्च केले जातील, २४३ कोटी पौंड भांडवली खर्च होईल व ५ कोटी पौंड भांडवल म्हणून परराष्ट्रांत गुंतविले जातील.

**मास्को–शांघाय टेलिफोनची सोय**—मास्कोहून थेट शांघायला रेडिओ टेलिफोनचें दळणवळण गेल्या मे दिनापासून सुरू करण्यांत आलें आहे. ह्या दोन शहरांमधील अंतर ४,१०० मैल आहे.

## भारतांतील जमीनदारीचा प्रश्न

[ भारतांतील जमीनदारीच्या प्रश्नाकडे ब्रिटनमधील सुप्रसिद्ध अर्थविषयक साप्ताहिक 'एकॉनॉमिस्ट' कोणत्या दृष्टीनें पहातें तें खालील सारांशरूप लेखावरून दिसून येतें. ]

भारतांत आज सर्वत्र जमीनदारी पद्धति नाहींशी करण्याचे प्रयत्न चालू आहेत. ह्या पद्धतींत असा काय दोष आहे कीं त्यामुळें ती आज जनतेच्या डोळ्यांत सलूं लागावी ? मुख्य दोष असा आहे कीं जमिनीवर राबण्यास कुळाला प्रलोभन नाहीं.

हिंदुस्थानांत जमीनदारी पद्धति ब्रिटिशांनीं गैरसमजानें चालू केली. ब्रिटिश अंमलापूर्वी जमीन कसणारा हा जमिनीचा मालक होता. सरकारी सारा भरण्याखेरीज त्याच्यावर दुसरा बोजा नसे. ह्याचा अर्थ मालकी हक्कानें जमिनीची मशागत करणाऱ्याच्या श्रमावर दुसरे पुष्ट होत नसत असें नाहीं. परंतु मालकाला जमीन गहाणवटीनें मुकण्याचा प्रसंग क्वचितच येत असे. १८ व्या शतकांत भारतांत जी अंदाधुंदी माजली तींत मात्र ह्या पद्धतीचा नाश झाला. राजसत्तेचे प्रतिनिधी, लष्करी अधिकारी अगर जमातींचे प्रमुख ह्यांनीं स्वतंत्रपणें खंड व सारा वसूल करण्यास सुरवात केली. मुंबई आणि तामीळनाड ह्या भागांत ब्रिटिश सत्तेनें मालकी हक्कानें जमीन कसणाऱ्या शेतकऱ्याचाच आधार घेतला. परंतु गंगेचें खोरें आणि तेलंगण ह्या भागांत मात्र सारावसुलीचीं कंत्राटें लिलावानें देण्याची पद्धति सुरू केली. ह्या पद्धतीमुळें उत्पन्न केला गेलेला जमीनदारांचा वर्ग ऐदी, विलासी, धनलोभी झाला. बिहारमधील जमीनदारीबद्दल एका इंग्लिश अर्थ-मंत्र्यानें असे उद्गार काढले आहेत, कीं ह्या जमीनदारीमुळें कोणताही मनुष्य क्रांतिकारक झाला तर त्यांत नवल वाटण्यासारखें कांहीं नाहीं.

बंगाल आणि औध प्रांतांत खंडकऱ्याला ठराविक खंड आणि वहिवाटीची शाश्वती हे दोन्ही हक्क होते असें समजण्यांत येत असे. पण वस्तुस्थिति मात्र तशी नसे. खंडकऱ्याला भोगवट्याची शाश्वती देणारा पहिला कायदा बंगालमध्यें १८८५ मध्यें झाला. संयुक्त प्रांतांत तर दुसऱ्या महायुद्धापूर्वी अधिकारावर असलेल्या काँग्रेस-सरकारनेंच प्रथम खंडकऱ्याला संरक्षण दिलें. तोंपर्यंत खंडकरी असुरक्षितच होता. त्यामुळें जमीनदारी खेड्यांतून सामाजिक दृष्ट्या वातावरण तंग असे. शेतकऱ्याला ह्या जमिनी आपल्या मालकीच्या होत्या अशी स्मृति असे. जमीन कसणाऱ्या खंडकऱ्यांची संख्या जमिनीच्या मानानें अधिक असल्यामुळें, आपल्या श्रमाचा जमीनदार अपहार करतो हेंही त्याला समजत असे. ही परिस्थिति लक्षांत घेऊन काँग्रेसनें १९४६ च्या निवडणुकीच्या जाहिरनाम्यांत जमीनदारी नष्ट करण्याच्या कार्यक्रमावर विशेष भर दिला. त्याप्रमाणें आतां निरनिराळ्या प्रांतांतून जमीनदारी रद्द करण्याचे कायदे होत आहेत अगर झाले आहेत.

जमीनदारी नाहींशी करण्याचें तंत्र सगळ्या प्रांतांतून सारखेंच आहे. प्रथम जमीनदाराच्या मालकीची जमीन भारताच्या लोकसत्ताक राज्याच्या मालकीची करण्यांत येते. नंतर ती प्रत्यक्ष कसणाऱ्या कुळाच्या मालकीची म्हणून जाहीर करण्यांत येते. कुळावर सरकारी सारा देण्याचीच तेवढी जबाबदारी टाकण्यांत येते. जमीनदार आणि इतर मधले लोक ह्यांना नुकसान-भरपाई देण्यांत येते. त्यांचें घर आणि ते स्वतः कसत असलेली जमीन मात्र त्यांच्याकडे राहूं देण्यांत येतें. नुकसान-भरपाई रोख रकमेनें देतां येते. परंतु बहुतेक प्रांत इतके गरीब आहेत कीं ही नुकसानभरपाई २॥ टक्के व्याजाच्या दराच्या कर्जरोख्यांच्या रूपानेंच द्यावी लागेल असें दिसतें. जमीनदारी नष्ट करण्याविरुद्ध जमीनदारवर्गानें फारशी चळवळ केली नाहीं. कारण, काँग्रेस त्यांना निदान नुकसानभरपाई तरी देत आहे. दुसरे जहाल राजकीय पक्ष तीही देणार नाहींत ह्याविषयीं ह्या वर्गाची खात्री झालेली आहे. जमीनदारी रद्द करण्याच्या कायद्याबरोबरच कुळांचे भोगवट्याचे हक्क रक्षण करणारे आणि सावकारीवर नियंत्रण घालणारे कायदे करण्यांत आले आहेत. सावकारांना धंदा करण्यास परवाना घ्यावा लागतो, व व्याजाचा दर सहा टक्क्यांपेक्षा अधिक घेतां येत नाहीं. भारतांतील खेड्यांतून स्वतःच्या मालकीची शेती असणारा शेतकरी-वर्ग निर्माण झाला तरच ग्रामीण जनतेची कुचंबणा थांबेल ह्याची जाणीव भारताला झाली आहे. अशी कुचंबणा झाल्यास तिचा फायदा रशिआला मिळेल हें उघडच आहे.

---

### भारतांतील विजेच्या दिव्यांची निर्मिती

भारतांत एकूण १० कारखान्यांत विजेचे दिवे तयार करण्यांत येतात. त्यांपैकी ५ पश्चिम बंगालमध्यें, १ बिहारमध्यें, १ उत्तर प्रदेशांत, १ मुंबईंत व १ म्हैसूरमध्यें आहे. ऑस्लर लँप मॅन्युफॅक्चरिंग कंपनी आणि मद्रास इलेक्ट्रिक इंडस्ट्रीज ह्या दोन कंपन्या लवकरच अनुक्रमें मुंबई आणि मद्रास येथें उत्पादनास प्रारंभ करतील. भारतीयांच्या मालकीच्या कंपन्यांत २½ कोटी रुपये भांडवल गुंतलेलें आहे. सर्व कंपन्यांची वार्षिक उत्पादनक्षमता २ कोटी, ४० लक्ष दिवे करण्याची आहे. परंतु १९५० सालीं भारतांत त्याच्या निम्म्याइतक्याहि दिव्यांचा खप होण्याजोगा नाहीं. १९५२ मध्यें ३ कोटी दिवे तयार होऊं शकतील, परंतु अपेक्षित अंतर्गत मागणी १ कोटी, ८० लक्ष. दिव्यांची असेल. वीज निर्मितीच्या सरकारी योजना मंदावल्या असल्याकारणानें उत्पादन व मागणी ह्यांत तफावत पडत आहे. मागणी वाढेल ह्या अपेक्षेनें कारखान्यांची वाढ होऊं दिली गेली. हिंदुस्थानच्या फाळणीमुळें पाकिस्तानांतील बाजारपेठ नाहींशी झाली आहे. सरकारनेंच ह्या धंद्याच्या वाढीस प्रोत्साहन दिलें असल्याकारणानें ह्याबाबत त्यावर जबाबदारी येऊन पडते, असें लँप फॅक्टरीज असोसिएशनचें म्हणणें आहे.

---

### पोलादाच्या उत्पादन वाढीसाठी भारत सरकारचें साह्य

स्टील कॉर्पोरेशन ऑफ बेंगाल, लिमिटेड व इंडियन आयर्न अँड स्टील कंपनी, लिमिटेड कलकत्ता या कंपन्यांना त्यांच्या पोलादाच्या उत्पादनवाढीच्या योजनांत साह्य करण्याकरितां ५ कोटी रुपये कर्ज म्हणून देण्याच्या भारत सरकारनें घेतलेल्या निर्णयानुसार, आतांपर्यंत या कंपन्यांना दोन कोटी रुपये देण्यांत आले आहेत. राहिलेली ३ कोटी रुपयांची रक्कम पुढील दोन वर्षांत देण्यांत येईल असें समजतें. सदरहू कंपन्यांचा उत्पादन-वाढीचा कार्यक्रम पुढील दोन-तीन वर्षांत पूर्ण झाल्यावर त्यांच्या उत्पादनांत प्रतिवर्षी २,०५,००० टनांची वाढ होईल. त्यांचें सध्यांचें उत्पादन प्रतिवर्षी सुमारें २,५०,००० टन आहे.

---

### वेटरना मिळणाऱ्या टिप्स ( बक्षिशी )

अमेरिकेंतील रेस्टॉरंटसचे आश्रयदाते रोज अंदाजीं ८२,५०,००० डॉलर्स टिप्स ( बक्षिस ) म्हणून देतात. अमेरिकेंतील ५,२५,००० सार्वजनिक उपाहारगृहांत असलेल्या ३०,००,००० वेटर्स व वेट्रेसेसना ( माल देणारे ) रोज प्रत्येकीं २.७५ डॉलर्स असें हें टिप्सचें प्रमाण पडतें.

## इं. फि. कॉर्पोरेशननें दिलेलीं कर्जें

इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशननें ३१ मार्च, १९५० अखेर संपलेल्या वर्षी भारतांतील कंपन्यांना दिलेल्या कर्जांचा तपशील आतां उपलब्ध झाला आहे. ह्या वर्षी कॉर्पोरेशननें ३,४१, २५,००० रुपयांचीं कर्जे दिलीं:–

उद्योगवार तपशील

| | रु. |
|---|---|
| कापड यंत्रसामुग्री | ४३,००,००० |
| इले. इंजिनिअरिंग | २,५५,००० |
| कापड गिरण्या | ७,८५,००० |
| केमिकल्स | ८,००,००० |
| सिमेंट | ४०,००,००० |
| लोखंड-पोलाद | २५,००,००० |
| इले.पॉवर | ९,००,००० |
| ॲल्युमिनिअम | ४०,००,००० |
| खाणी | ३०,००,००० |
| ऑइल मिल्स | १,७५,००० |
| इतर | २०,५०,००० |

भौगोलिक वांटणी

| | |
|---|---|
| प. बंगाल | १,२२,००,००० |
| मुंबई | ६३,५०,००० |
| उत्तर प्रदेश | ५१,७५,००० |
| मद्रास | ४५,००,००० |
| राजस्तान | ३०,००,००० |
| ओरिसा | १९,००,००० |
| मध्यप्रदेश | १०,००,००० |

मुंबईच्या वांट्यास त्याच्या औद्योगिक महत्त्वाच्या मानानें फारच कमी कर्ज आलें, हें वरील आकड्यांवरून स्पष्ट दिसून येईल.

---

**कापडावरील नफा**—ता. ३१ ऑक्टोबर १९४९ नंतर उत्पादन केल्या गेलेल्या गिरणीच्या कापडाच्या घाऊक विक्रीवर ७॥ टक्के आणि किरकोळ विक्रीवर १४ टक्के नफा घेण्यास परवानगी देणारें पत्रक भारत सरकारनें काढलें आहे. ह्या किंमतींत जकात अगर विक्रीकर मात्र धरण्यांत आलेला नाहीं.

**इलेक्ट्रो-केमिकल संशोधन संस्था**—करायकुडी येथील सेंट्रल इलेक्ट्रो-केमिकल रिसर्च इन्स्टिट्यूटच्या कार्यास १९५२ च्या प्रारंभीं सुरवात होईल असें समजतें. ह्या संस्थेच्या इमारतीचा पायाभरणी समारंभ १९४८ सालीं पं. नेहरूंच्या हस्तें झाला होता. ह्या संस्थेंतील उपकरणें व इतर साहित्य ह्यासाठीं ४५ लाख रुपये खर्च येईल.

**निजामची देणगी**—हैद्राबादचे राजप्रमुख निजाम ह्यांनीं कस्तुरबा गांधी स्मारक ट्रस्टला २०,००० रुपयांची देणगी दिली आहे असें समजतें.

**म्हैसूरला डी. डी. टी. चा कारखाना**—म्हैसूर येथें डी. डी. टी. हें कृमिनाशक द्रव्य तयार करण्याचा एक कारखाना लवकरच चालू होणार आहे असें समजतें. ह्या औषधाचा उपयोग करून म्हैसूर संस्थानांतील सागर तालुक्याला डांसापासून मुक्त करण्यांत आलें. ह्यामुळें ह्या तालुक्यांतील ४,५०० एकर जमीन लागवडीस आणतां येणं शक्य झालें. सागर तालुक्याप्रमाणेंच आणखी तीन तालुक्यांत डांसांचा उपद्रव फार आहे.


( मिरज येथें १९२९ सालीं स्थापन झालेली भागीदारांची जबाबदारी मर्यादित )

# दि मिरज स्टेट बँक लि.

–मिरज–

शेड्यूल्ड बँक

( स्थापना : १९२९ )

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. २५,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | ... | रु. १२,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड | ... | रु. ५,७०,००० |
| एकूण खेळतें भांडवल | ... | रु. ७०,००,००० |

शाखा

★ लक्ष्मेश्वर ( जि. धारवाड )

★ कुर्डूवाडी, पंढरपूर व अकलूज ( पे ऑफिस )

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. सरकारी रोखे, शेअर्स, सोनें, माल, स्थावर मिळकत वगैरेंचे तारणावर कर्ज अगर कॅश क्रेडिट दिलें जातें. समक्ष चौकशी बँकेकडे करावी अगर लिहावें.

डॉ. कृ. गो. गोसावी, चेअरमन. — के. डी. शिराळकर मॅनेजर

# बँक ऑफ पूना, लिमिटेड.

( शेड्यूल्ड बँक )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | रु. २५,८०,००० |
| वसूल भांडवल | रु. १२,५०,००० |

मध्यम वर्गीयांना मासिक उत्पन्नांतून एका रकमेनें मुलांच्या शिक्षणाचा खर्च भागवत नाहीं. दरमहा ५ रु. नियमित शिल्लक टाकल्यास पांच वर्षांत ३०० रुपये स्वतःचे होतात. अशा बचत योजनेच्या रकमेवर ३ टक्क्यापर्यंत व्याज मिळण्याची सोय.

**बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.**

जास्त माहितीसाठीं मुख्य कचेरीस अगर शाखांस लिहा.

मुख्य कचेरी:–५५५ रविवार पेठ, पुणें नं. २

स्थानिक शाखा:–( १ ) भवानी पेठ. ( २ ) सदाशिव पेठ.

बाहेरगांवच्या शाखा:– (१) टिळक चौक, सोलापूर, (२) वखार भाग, सांगली.

## अधिक धान्य पिकवा योजनांची प्रगति

### १९४९-५० सालांत ५०,००० टन धान्योत्पादनांत वाढ

सध्या चालूं असलेल्या निरनिराळ्या अधिक धान्य पिकवा योजनांमुळें १९४९-५० सालांत मुंबई राज्यांत अर्धा लाख टन धान्योत्पादनांत वाढ होईल असें वाटतें. तथापि उत्पादनाचा बरोबर आकडा रबी हंगामांतील कापणी संपल्यानंतर हातीं येईल.

प्रथम १९४७ सालीं मुंबई राज्याचें धान्योत्पादन वाढविण्यासाठा अधिक धान्य पिकवा योजना सुरू करण्यांत आल्या आणि नंतर १९४७ पासून पुढें पांच वर्षे त्या वाढविण्यांत आल्या. पण १९५१ अखेरपर्यंत अन्नधान्याच्या बाबतींत भारत स्वयंपूर्ण करण्याच्या भारत सरकारच्या निर्धारामुळें या योजना दुरुस्त करण्यांत आल्या आणि १९५१ सालपर्यंत त्यांची इष्ट फलनिष्पत्ति होण्याच्या दृष्टीनें त्या अधिक जोमदार करण्यांत आल्या.

मुंबई राज्यांत रेशन विभागांतील सुमारें ८०,३६,००० लोकसंख्येस सुमारे १५ लाख टन अन्नधान्याची आवश्यकता आहे. त्यापैकीं सहा लाख टन धान्य शेतकऱ्यांकडून खरेदी केलें जातें. उरलेलें नऊ लाख टन म्हणजे मुंबई राज्यास येणारी तूट होय.

अधिक धान्य पिकवा योजनांमुळें १९४७-४८ सालांत ६३,००० टन व १९४८-४९ सालांत १,०९,००० टन जादा धान्योत्पादन झालें. १९५०-५१ सालांत १,४०,००० टन जादा धान्योत्पादन होईल, तेव्हां १९५२ सालापर्यंत १९४८-४९ सालाहून ३,७२,००० टन जादा धान्योत्पादन होईल असें वाटतें.

### सुधारलेली लागवड व जादा लागवड

सुधारलेल्या पद्धतींनीं लागवड करून आणि लागवडींत वाढ करून दोन्ही मार्गांनीं धान्योत्पादनांत वाढ करणें हा अधिक धान्य पिकवा योजनांचा हेतु आहे. या दृष्टीनें सुधारलेलीं बियाणीं, खतें आणि रासायनिक खतें पुरविणें, पाटबंधाऱ्याचीं छोटीं व मोठीं कामें हातीं घेऊन पाणीपुरवठा करणें, पडीक जमिनी लागवडीखालीं आणणें आणि पिकांचें संरक्षण करणें हे या योजनांचे उद्देश आहेत.

भात, बाजरी, ज्वारी, गहूं इत्यादि पिकांच्या सुधारलेल्या बियाण्यांची पैदास व वांटप करण्यासंबंधींच्या १४ योजना सध्यां मुंबई राज्यांत चालूं आहेत. गेल्या फेब्रुवारी अखेरपर्यंत अशाप्रकारचें १,९९,००० बंगाली मण सुधारलेलें बियाणें शेतकऱ्यांना पुरविण्यांत आलें असून तें ६,७५,००० एकर जमिनीस पुरेसें होईल. त्याचप्रमाणें ४३,००० टन भुईमुगाची पेंड व ३५,००० टन मिश्र खतेंहि शेतकऱ्यांना सवलतीच्या दरानें पुरविण्यांत आलीं. शहरांत व खेड्यांत कम्पोस्ट खत व शेणखत तयार करण्यास सरकार उत्तेजन देत असतें. खोदण्यांत येणाऱ्या प्रत्येक खड्ड्यामागें सरकार आर्थिक मदत देतें. त्याचप्रमाणें या कार्यासाठी म्युनिसिपालिट्यांनाहि मदत करतें. फेब्रुवारी १९५० अखेरपर्यंत ग्रामीण भागांत कम्पोस्टचे एकूण दोन लाख खड्डे खोदण्यांत आले असून त्यांतून एकूण पांच लाख टन तयार खत काढण्यांत आलें. याच मुदतींत शहर म्युनिसिपालिट्यांनीं १,४७,००० टन कम्पोस्ट खत तयार केलें.

### पाटबंधाऱ्याचीं कामें

सरकारनें हातीं घेतलेल्या पाणी पुरवठ्याबाबतच्या १७ छोट्या कामांपैकीं सात कामें पूर्ण झालीं असून लिफ्ट इरिगेशनच्या १७ कामांपैकीं तीन कामें आतांपर्यंत पूर्ण झालीं आहेत. त्याचप्रमाणें नवीन विहिरी खोदण्यास व जुन्या दुरुस्त करण्यास, कच्चे व पक्के बंधारे बांधण्यास आणि विहिरींना बोर लावण्यास शेतकऱ्यांना सरकार उत्तेजन देत असतें. फेब्रुवारी अखेरपर्यंत एकूण ४,६०० नव्या विहिरी खोदण्यांत आल्या असून १,४०० जुन्या विहिरी दुरुस्त करण्यांत आल्या आहेत. याच मुदतींत ५,५०० एकर जमिनीस पाणी पुरवठा करण्याच्या दृष्टीनें ५३० नवे बंधारे बांधण्यांत आले.

### ट्रॅक्टर-नांगरणी

जमिनीची सुधारणा करण्याबाबतच्या कार्यक्रमाखालीं मुंबई राज्यांत एकूण २३६ ट्रॅक्टर चालूं आहेत. फेब्रुवारी अखेरपर्यंत ट्रॅक्टरच्या सहाय्यानें दोन लाख एकर जमीन नांगरण्यांत आली असून बांध व जमीन सुधारणेबाबतच्या इतर उपायांचाहि अवलंब करण्यांत येत आहे. ५,००० एकर पडीक जमीन लागवडीखालीं आणण्याबाबतच्या १७ योजना सध्या राज्यांत चालूं आहेत. फेब्रुवारी अखेरपर्यंत १,२०० एकर पडीक जमीन लागवडीखालीं आणण्यांत आली असून ४५७ कुटुंबांची अशा वसाहतींत व्यवस्था लागलेली आहे. त्याचप्रमाणें खार व खाजन जमिनी लागवडीखालीं आणण्याचें कामहि प्रगतिपथावर आहे.

पिकांवरील कीड व रोगांचा प्रतिबंध करणें आणि वन्य श्वापदापासून पिकांचें संरक्षण करणें याबाबत उपाययोजना करण्यांत येत आहेत. यासाठी पीक संरक्षणाचें खास कार्य हातीं घेण्यांत आलें असून त्यांत तारांचीं कुंपणें पुरविणें व शिकार संघ स्थापन करणें इत्यादि कार्यक्रमांचा समावेश करण्यांत आला आहे.

शेतकऱ्यांना निरनिराळ्या मार्गांनीं मदत करून आणि उत्तम पिकांना बक्षिसें देऊन सरकार त्यांना चांगलें पीक काढण्यास उत्तेजन देतें. त्याचप्रमाणें पूरक अन्नपिकें म्हणून रताळीं, बटाटे व भाजीपाला लावण्यासहि शेतकऱ्यांना उत्तेजन देण्यांत येतें.

मुंबई राज्यांत 'डायरेक्टर ऑफ प्रॉडक्शन' यांची नेमणूक केल्यापासून योजनांची योग्य व जलद अम्मलबजावणी होत आहे.

### सर्वांगीण सहकार्य

जिल्हा ग्राम सुधारणा मंडळें, तालुका ग्राम सुधारणा मंडळें आणि ग्राम धान्योत्पादन समित्या स्थापन करून त्यांवर शेतकरी किंवा शेतकऱ्यांचे प्रतिनिधी घेण्यांत आल्यामुळें विविध योजनांच्या अम्मलबजावणीच्या बाबतींत बिन-सरकारी लोकांचेंहि सहकार्य मिळत आहे. अधिक धान्य पिकवा मोहिमेंत राज्यांतील प्राथमिक शाळांच्या शिक्षकांचें व विद्यार्थ्यांचेंहि सहकार्य मिळत आहे. अन्नपरिस्थितीचें गांभीर्य व निकड शहरवासियांना पटवून देण्याच्या दृष्टीनें जिल्हा ग्राम सुधारणा मंडळांच्या वतीनें शहरभागांत किसान सहाय्यक दलेंहि स्थापन करण्यांत आलीं आहेत. होमगार्डांच्या संघटनेचाहि नुकताच धान्योत्पादन वाढीच्या मोहिमेसाठीं उपयोग करून घेण्यांत आला.

---

**जपानमधील बेकार**—गेल्या वर्षअखेर जपानमधील बेकारांची संख्या ८९,१०,००० होती असें अधिकृतरीत्या जाहीर झालें आहे. कामगारांना वेतनानें विकत मिळूं शकणाऱ्या वस्तूंच्या दृष्टीनें, ह्या वेतनाची किंमत युद्धपूर्व वेतनाच्या ७५.२ टक्के एवढीच आहे. जपानी युद्धकैदी परत येऊं लागल्यामुळेंही बेकारांची संख्या वाढलेली आहे.

**स्टेट ट्रॅन्सपोर्ट गाड्यांत जादा उतारू**—मुंबई राज्यांतील स्टेट ट्रॅन्सपोर्टच्या गाड्यांतून २५ टक्के जादा उतारू घेण्याची सवलत जून १९५० पर्यंत वाढविण्यांत आली आहे.

## इन्कम टॅक्सविषयीं कांहीं आंकडे

### भारतांत प्राप्तीवरील कर भरणाऱ्यांची वर्गवारी

| उत्पन्नाचा गट | कर भरणारे | एकूणशीं प्रमाण% | त्यांनीं दिलेला कर (कोटी रु.) | एकूणशीं प्रमाण% |
|---|---|---|---|---|
| ३,००० रु. खालीं | १,२४,७५७ | २६·७ | ०·७० | ०·४ |
| ३,०००– ३,५०० | ५१,०४२ | ११·० | ०·५३ | ०·३ |
| ३,५००– ५,००० | ८५,३२३ | १८·० | १·३५ | ०·९ |
| ५,०००–१०,००० | १२,७०३ | २४·० | ४·८७ | ३·२ |
| १०,०००–१५,००० | ३८,६९३ | ८·३ | ४·६३ | २·० |
| १५,००० वर | ४८,५०१ | १०·४ | ६४·१३ | ४२·३ |
| कंपन्या | ७,५०० | १·६ | ७५·७१ | ४९·९ |
| एकूण | ४,६८,५७९ | १०० | १५१·९२ रु. | १०० |

### प्राप्तीवरील कर किती लोक भरतात ?

| | |
|---|---|
| अमेरिका—३३% | ग्रेट ब्रिटन—३३% |
| (१३½ कोटींपैकीं ४½ कोटी) | (४½ कोटींपैकीं १½ कोटी) |
| ऑस्ट्रेलिया—२७% | भारत—०·१५% |
| (८० लाखांपैकीं २०½ लाख) | (३० कोटींपैकीं ४,६८,०००) |

### करमाफीच्या मर्यादा

| | |
|---|---|
| भारत | ३,००० रु. |
| अमेरिका | १३,३३२ रु. |
| ग्रेट ब्रिटन | ५,००० रु. |
| ऑस्ट्रेलिया | २,१८७ रु. |

### १९४९ मधील सोन्याचें उत्पादन

१९४९ मध्यें सोन्याचें जागतिक उत्पादन २,४९,००,२०० औंस झालें. हें उत्पादन १९४८ मधील उत्पादनापेक्षा ७,००,००० औंस अधिक आहे. ह्या दोन्ही वर्षीं रशियाचें २०,००,००० औंस उत्पादन झालें असा अंदाज करण्यांत आला आहे.

दक्षिण आफ्रिका आणि कॅनडा येथील खाणींचें उत्पादन वाढलें. त्यामुळेंच जागतिक उत्पादन जास्त झालें. अमेरिकेचें उत्पादन थोडेसें घटलेलेंच आढळेल.

### सोन्याचें जागतिक उत्पादन
( आकडे हजार औंसांच )

| | १९४७ | १९४८ | १९४९ |
|---|---|---|---|
| द. आफ्रिका | ११,२०० | ११,५८५ | ११,७०५ |
| कॅनडा | ३,०७० | ३,५३० | ४,०७५ |
| रशिया | २,००० | २,००० | २,००० |
| अमेरिका | २,१६५ | २,०२५ | १,९९६ |
| ऑस्ट्रेलिया | ९३७ | ८३८ | ८८० |
| भारत | १७२ | १८० | १६४ |
| जागतिक उत्पादन | २३,५२४ | २४,२०० | २४,९०० |
| ब्रिटिश साम्राज्य | १६,८५९ | १७,७७९ | १८,४३० |
| ,, ,, % | ७१·७ | ७३·५ | ७४·० |
| द. आफ्रिका % | ४७·६ | ४७·८ | ४७·१ |

बेडेकर लोणचीं वापरा

पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड
स्थापना–१९१७
फोन नं. २४८३ | तारेचा पत्ता "Cencobank" | पोस्टबॉक्स नं. ५११
मुख्य कचेरीः–लक्ष्मी रोड, पुणें शहर.
शहर शाखा : डेक्कन जिमखाना, सर परशुराम-भाऊ कॉलेज, फर्ग्युसन कॉलेज, सेव्हिंग बँक सेक्शन.
–: शाखा :–
जुन्नर, खेड, दौंड, इंदापूर, सासवड, घोडनदी, बारामती, निरा, मंचर व भोर
—:बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातातः—
जास्त माहितीसाठी लिहा अगर समक्ष भेटा.
मो. वि. रबडे
मॅनेजिंग डायरेक्टर

Dr. Waman Gopal's Sarsaparilla
BEST BLOOD PURIFIER

उंची कपड्याचा व स्नानाचा
उत्तम साबण
निर्मल सोप
दि माणिक सोप वर्क्स, कराड (साता-

हें पत्र पुणें, पेठ मांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.